## गणेशोत्सवात पावसाची हजेरी! ठाण्यात IMD चा यलो अलर्ट

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाने पुन्हा एकदा महाराष्ट्रात जोरदार हजेरी लावण्यास सुरुवात केली आहे. गणेशोत्सवाच्या काळात राज्यात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाने ठाणे जिल्ह्यासाठी १३ सप्टेंबर रोजी पावसाचा इशारा जारी केला आहे. हवामान विभागाने ठाणे जिल्ह्याला पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. पुढील 24 तासांत या जिल्ह्यांमध्ये पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.


# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
Web portal : hinduprakashwarta.com
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी


## महाबोधी महाविहारमुक्तीसाठी आठवले यांचे शहांना निवेदन

**नवी दिल्ली:** बुद्धगयेतील ऐतिहासिक महाबोधी महाविहार पूर्णपणे बौद्ध धर्माच्या ताब्यात असावे आणि त्याचे सर्व विश्वस्त व चेअरमन बौद्धच असावेत, या प्रमुख मागणीसाठी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना. रामदास आठवले यांच्या नेतृत्वात बौद्ध भिक्षू संघाच्या एका उच्चस्तरीय शिष्टमंडळाने नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. नवी दिल्लीतील ६-ए, कृष्णा मेनन मार्ग येथील निवासस्थानी झालेल्या या बैठकीत, महाबोधी महाविहाराच्या व्यवस्थापनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

छत्रपती संभाजीनगर ❀ रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १४३ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रु. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

# बंजारा समाजाच्या ST आरक्षणाच्या मागणीसाठी जिंतूरमध्ये आंदोलन तीव्र; रस्ता रोकोनंतर बाजारपेठेत दुकाने केली बंद

## विनोद आडे यांचे सात दिवसापासून उपोषण सुरू; शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आंदोलकांची मागणी

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**जिंतूर प्रतिनिधी :** बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचे (ST) आरक्षण लागू करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी जिंतूरमध्ये आंदोलन अधिक तीव्र झाले आहे. गेल्या सात दिवसांपासून बंजारा समाजाचे नेते विनोद आडे हे आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणाला बसले असून,त्यांच्या उपोषणाला दिवसेंदिवस समाजातून मोठा पाठिंबा मिळत आहे. शासनाने बंजारा समाजाच्या ST आरक्षणाच्या मागणीवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, या मागणीसाठी आज बंजारा समाजाच्या माहिलानी पारंपरिक पद्धतीने गाणे गात रास्ता रोको केला .



या आंदोलनामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला. मोठ्या संख्येने समाजबांधव आंदोलनस्थळी दाखल झाले होते.आंदोलकांनी शासनाने बंजारा समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे आणि गेल्या सात दिवसांपासून उपोषण करणारे विनोद आडे यांच्या उपोषणाची तातडीने दखल घ्यावी,अशी मागणी केली. सुरुवातीला हे आंदोलन शांततेच्या मार्गाने सुरू होते. मात्र,काही वेळानंतर आंदोलनाला वेगळे वळण मिळाले.आंदोलनातील एका गटाने हातात लाठ्या-काठ्या घेत मुख्य बाजारपेठेच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी काही दुकानदारांना दुकाने बळजबरीने बंद करण्यास भाग पाडण्यात आले,तसेच काही ठिकाणी दुकाने बंद करण्याचा प्रयत्न झाल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.दरम्यान अचानक निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे बाजारपेठ परिसरात नागरिक आणि व्यापाऱ्यांमध्ये काही काळ दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते विशेषता पालकांनी आपल्या विद्यार्थ्यांना विविध शाळेमध्ये शाळा सुरू असल्याने पाठविले होते अचानक उद्भवलेल्या परिस्थितीमध्ये पालक आणि विद्यार्थी यांची मोठी कुचंबना झाली आंदोलकांनी बाजारपेठ व इतर शिवाजी चौक व मध्यंतरी जाणारे रस्ते सुद्धा बंद केल्याने नागरिक संताप व्यक्त करीत होते मात्र, त्यानंतर परिस्थिती पुन्हा नियंत्रणात आली.पोलिसांनी तातडीने परिस्थितीवर लक्ष ठेवत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी खबरदारी घेतली. यावेळी बंजारा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न केवळ एका समाजाचा नसून, आपल्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने पाहावे, अशी भावना आंदोलनकर्त्यांकडून व्यक्त करण्यात आली. गेल्या सात दिवसांपासून विनोद आडे उपोषण करत असतानाही शासनाकडून अपेक्षित निर्णय झालेला नसल्याने समाजामध्ये नाराजी वाढत असल्याचे आंदोलकांनी सांगितले.

दरम्यान,आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिंतूर शहरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला असून, संवेदनशील ठिकाणी पोलिसांकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि शहरातील कायदा व सुव्यवस्था कायम राहावी, यासाठी प्रशासनाकडून खबरदारी घेण्यात येत आहे.

बंजारा समाजाच्या ST आरक्षणाच्या मागणीवर शासनाने आता विलंब न करता ठोस भूमिका स्पष्ट करावी, विनोद आडे यांच्या उपोषणाची तातडीने दखल घ्यावी आणि समाजाच्या मागणीवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

सात दिवसांपासून सुरू असलेल्या उपोषणानंतर आज रस्ता रोको आणि त्यानंतर बाजारपेठेत दुकाने बंद करण्याच्या प्रयत्नामुळे जिंतूरमधील बंजारा समाजाचे आरक्षण आंदोलन आता अधिक तीव्र झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. त्यामुळे शासन या आंदोलनाची दखल घेऊन पुढील काळात कोणता निर्णय घेते, याकडे संपूर्ण जिंतूर तालुक्याचे लक्ष लागले आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन चर्चा करण्यात आली यावेळी तहसीलदार शितल कच्छवे नायब तहसीलदार प्रशांत राखे उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल विभूते पोलीस निरीक्षक नामदेव रेड्डी हे उपस्थित होते.

### रस्ता रोकोनंतर बाजारपेठेत दुकाने बंद करण्याचा प्रयत्न

**सुरुवातीला हे आंदोलन शांततेच्या मार्गाने सुरू होते. मात्र, काही वेळानंतर आंदोलनाला वेगळे वळण मिळाले. आंदोलनातील एका गटाने हातात लाठ्या-काठ्या घेत मुख्य बाजारपेठेच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी काही दुकानदारांना दुकाने बळजबरीने बंद करण्यास भाग पाडण्यात आले, तसेच काही ठिकाणी दुकाने बंद करण्याचा प्रयत्न झाल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान अचानक निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे बाजारपेठ परिसरात नागरिक आणि व्यापाऱ्यांमध्ये काही काळ दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, त्यानंतर परिस्थिती पुन्हा नियंत्रणात आली. पोलिसांनी तातडीने परिस्थितीवर लक्ष ठेवत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी खबरदारी घेतली.**

## थोडक्यात वार्ता

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची आज मुंबईत पत्रकार परिषद




**मुंबई :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह १३ आणि १४ सप्टेंबरला मुंबईच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर येत असून, या दौऱ्यात ते पत्रकार परिषदेला संबोधित करणार असल्याने संपूर्ण देशाचे लक्ष त्याकडे लागले आहेत. रविवारी सायंकाळी ४ वाजता नरिमन पॉइंट येथील महिला विकास महामंडळ (माविम) सभागृहात ही पत्रकार परिषद होईल. त्याशिवाय रविवारी ते फोर्टमधील दि एशियाटिक सोसायटीला भेट देतील. प्राच्यविद्या संशोधनाचा समृद्ध वारसा जपणाऱ्या एशियाटिक सोसायटीच्या भेटीत शाह संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी आणि सदस्यांशी संवाद साधणार असून, दुर्मीळ पोथ्यांच्या प्रदर्शनालाही ते भेट देतील. त्यानंतर सोमवारी वाशीतील सिडको प्रदर्शन केंद्रात होणाऱ्या सहाव्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनात ते सहभागी होतील.(Central Home Minister Amit Shah) एशियाटिक सोसायटीला 'राष्ट्रीय महत्त्वाची संस्था' असा विशेष दर्जा देण्याची मागणी गेल्या चार वर्षांपासून केंद्राकडे प्रलंबित आहे. शाह यांच्या भेटीच्या पार्श्वभूमीवर हा प्रश्न मार्गी लागण्याच्या अपेक्षांना पुन्हा चालना मिळाली आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून याबाबतही शाह यांच्यासमोर भूमिका मांडली जाण्याची शक्यता आहे. शाह यांच्या भेटीदरम्यान संस्थेतील दुर्मीळ पोथ्यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. त्यात पाच खंडांमध्ये प्रसिद्ध झालेल्या पा. वा. काणे यांच्या 'भारतीय धर्मशास्त्राचा इतिहास' या ग्रंथाचे संस्थेने जतन केलेले संदर्भसाहित्यही महत्त्वाचे ठरणार आहे.

### काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रत्नाकर महाजन यांचे निधन



**पुणे :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी प्रवक्ते रत्नाकर महाजन यांचे शनिवारी सकाळी निधन झाले. पुण्यातील राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते 80 वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. शनिवारी दुपारी 1 वाजता पुण्यातील नवी पेठेतील वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. रत्नाकर महाजन हे काँग्रेसमधील अभ्यासू, संयमी आणि निष्ठावंत नेते म्हणून ओळखले जात होते. ते राज्य नियोजन महामंडळाचे माजी अध्यक्ष होते. तसेच लोकबोधिनी संस्थेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिलं होतं. समाजवादी विचारवंत आणि राजकीय विश्लेषक म्हणूनही त्यांची वेगळी ओळख होती. रत्नाकर महाजन हे व्यवसायाने डॉक्टर होते. मात्र समाजवादी विचारसरणीने प्रभावित होऊन त्यांनी सामाजिक क्षेत्रात काम करण्यास सुरुवात केली. आणीबाणीच्या काळात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. या काळात त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला होता. जयप्रकाश नारायण, डॉ. राम मनोहर लोहिया, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे आणि ग. प्र. प्रधान यांसारख्या समाजवादी विचारवंतांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. समाजवादासोबतच आगरकर आणि महात्मा गांधी यांच्या विचारांनाही त्यांनी आपल्या सामाजिक आणि राजकीय कार्यातून पुढे नेण्याचा प्रयत्न केला. सामाजिक क्षेत्रात विविध जबाबदाऱ्या सांभाळल्यानंतर ते काँग्रेसचे प्रवक्ते झाले. डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळात काँग्रेसची राजकीय पिछेहाट होत असताना पक्षाची भूमिका प्रभावीपणे मांडण्याची जबाबदारी रत्नाकर महाजन यांनी सांभाळली.

## "शाल जोडे"




# 'सीमेवर शांतता आणि स्थैर्य हीच द्विपक्षीय संबंधांची प्राथमिक अट'

## पंतप्रधान मोदींचा चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी झालेल्या चर्चेत स्पष्ट संदेश

**नवी दिल्ली:** भारत आणि चीन संबंधांमध्ये सुधारणा व सहकार्याचा नवा अध्याय सुरू करण्याच्या प्रयत्नांदरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी झालेल्या द्विपक्षीय बैठकीत सीमेवरील शांतता आणि स्थैर्याचा मुद्दा अत्यंत ठामपणे मांडला आहे. ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या महत्त्वपूर्ण चर्चेत, सीमावर्ती भागात शांतता आणि स्थिरता कायम राहणे हे दोन्ही देशांमधील संबंधांच्या सातत्यपूर्ण विकासासाठी आवश्यक पाया असल्याचे पंतप्रधानांनी स्पष्ट केले.



**विद्यमान करारांचे पालन आणि तीन तत्त्वांचा आग्रह:**

चर्चेदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी सीमा प्रश्नाशी संबंधित विद्यमान करार आणि दोन्ही देशांमधील परस्पर समजुतींचे काटेकोर पालन करण्याची गरज अधोरेखित केली. सीमा प्रश्नावर तोडगा काढण्याच्या प्रक्रियेत ठरलेल्या व्यवस्थांचा सन्मान करणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, भारत आणि चीनच्या संबंधांमध्ये मतभेद असले तरी त्यांचे रूपांतर वादात होऊ नये, अशी ठाम भूमिका मांडत संबंध पुढे नेताना परस्पर आदर, परस्पर संवेदनशीलता आणि परस्पर हित या तीन मूलभूत तत्त्वांचे पालन झाले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीचे वर्णन परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जायसवाल यांनी 'सार्थक' असे केले आहे.

**शी जिनपिंग यांची भूमिका आणि सहकार्यावर भर:**

चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी भारत आणि चीन हे जगातील दोन सर्वाधिक लोकसंख्या असलेले देश तसेच 'ग्लोबल साउथ'मधील महत्त्वाचे सदस्य असल्याचे नमूद केले. बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीत दोन्ही देशांवर मोठी जबाबदारी असल्याचे सांगत त्यांनी ब्रिक्सच्या चौकटीत उच्च दर्जाचे सहकार्य वाढविण्याचे आवाहन केले. चीन भारतासोबतचे संबंध धोरणात्मक आणि दीर्घकालीन दृष्टिकोनातून पाहतो, असे स्पष्ट करत दोन्ही देशांनी एकमेकांच्या सामर्थ्यांमधून शिकत सामायिक विकास साधावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. तियानजिन येथे झालेल्या मागील बैठकीनंतर भारत-चीन संबंधांमध्ये झालेल्या प्रगतीचा आढावाही दोन्ही नेत्यांनी घेतला.

**निष्कर्ष व भविष्यातील दिशा:**

सीमा प्रश्नावर न्याय्य, योग्य आणि परस्पर स्वीकारार्ह तोडगा काढण्याच्या बांधिलकीचा पुनरुच्चार दोन्ही नेत्यांनी केला. या उच्चस्तरीय बैठकीतून भारताची भूमिका अत्यंत स्पष्ट झाली आहे—द्विपक्षीय संबंध सुधारण्यास भारताची संपूर्ण तयारी आहे, परंतु त्यासाठी सीमेवर शांतता आणि स्थैर्य ही प्राथमिक अट राहील. पंतप्रधान मोदींनी शी जिनपिंग यांचे भारतात स्वागत करताना भारताच्या ब्रिक्स अध्यक्षतेदरम्यान चीनकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल आभार मानले आणि त्यानंतर विविध द्विपक्षीय मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली.

# वाळू लिलाव धोरणात राज्य सरकारकडून बदल

## ई-लिलावासोबत ई-निविदा पद्धत बंधनकारक

**मुंबई :** वाळू आणि रेती घाटांच्या लिलाव प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याबरोबरच अनधिकृत उत्खननाला आळा घालण्यासाठी राज्य सरकारने वाळू निर्गती धोरणात महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. सुधारित नियमांनुसार वाळू घाटांच्या लिलावासाठी ई-लिलावासोबत ई-निविदा पद्धतीचा अवलंब करणे बंधनकारक करण्यात आले असून, तीन फेऱ्यांची प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार सुधारित धोरणाबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

नवीन नियमांनुसार, पर्यावरण परवानगी मिळालेल्या नदीपात्रातील सर्व वाळूघाटांचा तालुकानिहाय एकत्र लिलाव करण्यात येणार आहे. लिलाव विहित मुदतीत पूर्ण व्हावा यासाठी बोलीच्या फेऱ्यांचे निकषही निश्चित करण्यात आले आहेत. पहिल्या फेरीत किमान तीन, दुसऱ्या फेरीत किमान दोन, तर तिसऱ्या फेरीत किमान एक पात्र निविदाधारक असणे आवश्यक राहणार आहे. तीनही फेऱ्यांनंतरही लिलाव न झाल्यास संबंधित वाळू गट स्थानिक वापरासाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत.

यापूर्वीच्या धोरणात दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीसाठीची कालमर्यादा तसेच आवश्यक निविदाधारकांच्या संख्येबाबत स्पष्टता नव्हती. त्यामुळे विविध जिल्ह्यांमध्ये लिलावासाठी वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब केला जात होता. परिणामी लिलाव प्रक्रियेला विलंब होऊन शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले होते. या पार्श्वभूमीवर सुधारित नियम लागू करण्यात आले आहेत. सर्वाधिक बोली लावणाऱ्या एच-१ निविदाधारकाने विहित मुदतीत उर्वरित रक्कम भरली नाही, तर त्यानंतर एच-२ आणि एच-३ निविदाधारकांना त्याच दराने संधी देण्यात येणार आहे. त्यामुळे सर्वाधिक बोलीदाराकडून व्यवहार पूर्ण न झाल्यास पुढील पात्र निविदाधारकांमार्फत प्रक्रिया पूर्ण करण्याचा मार्ग खुला राहणार आहे.

# पीक परिस्थितीचा अहवाल सादर करा- महसूल मंत्री बावनकुळे यांचे निर्देश

**छत्रपती संभाजीनगर, दि.१२(जिमाका) :** मराठवाड्यातील सर्व जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसिलदार यांनी पीक परिस्थितीची पाहणी करुन सोमवारी अहवाल सादर करावा,असे निर्देश राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज यंत्रणेला दिले. श्री. बावनकुळे यांनी दुरदृष्यप्रणालीद्वारे आज आढावा घेतला.

विभागीय आयुक्त जी.श्रीकांत तसेच छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्ह्याचे जिल्हाधिकारी या आढावा बैठकीत सहभागी झाले होते. गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने ओढ दिली आहे. त्यापार्श्वभुमिवर शेतकऱ्यांची पीक पाण्याची तसेच पशुधनाच्या चाऱ्याची नेमकी स्थिती काय आहे, याबाबत वस्तूनिष्ठ माहिती येत्या दोन दिवसात सादर करावी. त्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतांवर जाऊन पाहणी करावी. पीक स्थितीचा आढावा घ्यावा,असे निर्देश त्यांनी दिले.

यावेळी छत्रपती संभाजीनगर विभागाची माहिती सादर करण्यात आली की, विभागात सरासरी पर्जन्यमानाच्या ५७ .७८ टक्के पाऊस झाला आहे.मागील वर्षी याच तारखेपर्यंत १०६.३८ टक्के पर्जन्यमान नोंदविण्यात आले होते. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील पर्जन्यमान याप्रमाणे- छत्रपती संभाजीनगर-८२.३६ टक्के, जालना-८०.०४ टक्के, नांदेड-७४.२३ टक्के, हिंगोली-७०.०८ टक्के, बीड-६४.०५ टक्के, धाराशिव-६२.७३ टक्के, परभणी-५५.३४ टक्के आणि लातूर-५२.१८ टक्के. विभागात एकूण ४९६ मंडळे असून सर्वाधिक २१८ मंडळे हे मध्यम (५० ते ७५ टक्के) पावसाच्या श्रेणीत आहेत.

विभागातील प्रकल्पांमध्ये मोठ्या ११ प्रकल्पात ६६.७४ टक्के जलसाठा असून मध्यम प्रकल्प ७६ असून त्यात २१.३४ टक्के तर लघु प्रकल्प ७८० असून त्यात २०.४८ टक्के जलसाठा आहे.

विभागात सरासरी ९३ टक्के क्षेत्रावर खरीपाची पेरणी झाली आहे. विभागात असलेल्या ५५.६६ लक्ष जनावरांसाठी १ कोटी ०७ मे.टन चारा साठा उपलब्ध आहे. पावसाचा खंड दि.२३ ऑगस्ट ते ११ सप्टेंबर हा दीर्घ म्हणजेच २० दिवसांचा खंड आहे.

येत्या दोन दिवसांत पाहणी करुन अहवाल सादर करावा,असे निर्देश महसूल मंत्री बावनकुळे यांनी यावेळी दिले.

# बनावट मृत्यू प्रमाणपत्र अन्...... कोटींचा फ्लॅट विकला; मुंबईत बायकोचा धक्कादायक कारनामा!

**मुंबई:** 'मढ्याच्या टाळूवरचं लोणी खाणं' ही म्हण आपण अनेकदा ऐकली असेल किंवा त्या म्हणीचा कोणाला बोलण्यासाठी सुद्धा केला असेल. पण मुंबईमध्ये ही म्हण एका महिलेने तिच्या रिअल लाईफमध्ये तंतोतंत वापरली आहे. जिवंत पतीला मृत दाखवून त्याचं खोटं मृत्यूचं प्रमाणपत्र दाखवून एका महिलेने १.११ कोटींचा फ्लॅट परस्पर विकल्याचा प्रकार मुंबईमध्ये घडला आहे. या घटनेमुळे अनेकांच्या पायाखालची जमीनच सरकली आहे. घडलेला प्रकार पोलिसांना समजताच महिलेला अटक केली असून तिच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

हा संपूर्ण प्रकार, मुंबईतल्या बोरिवली परिसरामध्ये घडलेला आहे. एका खासगी कार्यालयामध्ये नोकरीला असणाऱ्या रायन क्रास्टा नावाच्या व्यक्तीसोबत हा संपूर्ण प्रकार घडला आहे. रायनने २०१६ साली बोरिवलीतील एल.एम. रोडवरील 'राज व्हिला को. ऑपरेटिव्ह हौ. सो. लि'मध्ये ७३.८० लाखाला १ बीएचके फ्लॅट खरेदी केला होता. हा फ्लॅट रायन आणि त्याची पत्नी शालिनी डायना क्रास्टा ह्या दोघांच्याही एकत्रित नावावर होता. ह्या फ्लॅटसाठी रायन आणि शालिनीने ५६ लाखांचं होम लोन घेतलं होतं. दोघांनीही एकत्रित रूमचं लोन सुद्धा फेडलं. पण कालांतराने त्यांच्यामध्ये काही कारणामुळे कौटुंबिक वाद झाला आणि त्यामुळे ते दोघंही वेगळे राहू लागले. दरम्यान, मे २०२६ मध्ये हे संपूर्ण प्रकरण उघडकीस आले. रायनचा मित्र प्रसाद पाताडे याने त्याला, त्याचा बोरिवलीतला फ्लॅट एका खाजगी बँकेकडे गहाण ठेवण्यात आल्याची माहिती दिली. धर्मेश जगदीश तन्ना आणि त्यांची पत्नी धारा धर्मेश तन्ना यांना १.११ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करून घेतल्याचे त्यांना समजले. त्यानंतर रायन आणि त्याच्या आईने खाजगी बँकेशी संपर्क साधला असता, शालिनीने ११ एप्रिल २०२५ रोजी एका नोंदणीकृत दस्तऐवजाद्वारे तो फ्लॅट धर्मेश तन्ना यांना विकल्याची धक्कादायक माहिती समजली. शालिनीने रायनचं खोटं मृत्यू प्रमाणपत्र आणि इतरत्र खोटी कागदपत्रे तयार करून मालमत्ता विकली होती.

या संपूर्ण प्रकरणामुळे रायन आणि त्यांच्या आईची पायाखालची जमिनच सरकली. फ्लॅट विकण्यासाठी शालिनीने रायनचे मृत्यू प्रमाणपत्राव्यतिरिक्त, सोसायटीचे ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) ते सुद्धा बनावट होते. इतकंच नाही तर, शालिनीने रायनची कायदेशीर वारसदार असल्याचं खोटं प्रतिज्ञापत्र सुद्धा बनवून घेतलं होतं. रायनने सोसायटीचे अध्यक्ष गौतम पुरोहित, सचिव पूजा पाताडे आणि खजिनदार एस. पाटील यांच्याकडे सोसायटीच्या ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी)ची चौकशी केली असता, अशी कोणतीही एनओसी दिली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शिवाय, त्या एनओसीवर असलेल्या स्वाक्षऱ्या सुद्धा खोट्या असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. बनावट मृत्यू प्रमाणपत्र आणि ना हरकत प्रमाणपत्र (NOC) तयार करण्यासाठी शालिनीला कोणी मदत केली?

याचा तपास पोलीस आता करत आहेत. प्राथमिक तपासानुसार, शालिनीने तन्ना कुटुंबाकडून फ्लॅटच्या मोबदल्यात १.११ कोटी रुपये घेतल्याचा आरोप आहे. ही रक्कम तिने कुठे गुंतवली? त्या १.११ कोटी रुपयांचा तिने कसा वापर केला? सह अशा अनेक प्रश्नांची उकल आता पोलिसांकडून केली जात आहे. शालिनीला बुधवारी, ९ सप्टेंबर रोजी अटक करण्यात आली असून तिला बोरिवली दंडाधिकारी न्यायालयात हजर करण्यात आले आहे. तिला पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# सं पा द की य

## नफिसा जोसेफ आत्महत्या प्रकरणातील न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

कायद्याच्या दरबारात उशीर झाला तरी न्याय मिळण्याची आस कशी कायम असते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे बहुचर्चित नफिसा जोसेफ आत्महत्या प्रकरण होय. प्रसिद्ध व्हिडिओ जॉकी (VJ) आणि मॉडेल नफिसा जोसेफ हिच्या आत्महत्येप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने व्यावसायिक गौतम खंडजुआ यांचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळून लावत त्यांच्यावरील खटला चालवण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. मृत्यूपूर्वीची परिस्थिती आणि त्यावेळचे घटनाक्रम खटला चालवण्यासाठी पुरेशी असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले आहे. तब्बल दोन दशकांहून अधिक काळ उलटून गेल्यानंतरही या प्रकरणात न्याय मिळवण्याच्या दिशेने पडलेले हे पाऊल मानवी संवेदनशीलता आणि कायद्याच्या कठोर भूमिकेचे दर्शन घडवणारे आहे. मे २००४ मध्ये साखरपुडा झाल्यानंतर आणि विवाहाची तयारी अंतिम टप्प्यात असताना, २९ जुलै २००४ रोजी अंधेरी येथील आपल्या घरी नफिसाने गळफास घेऊन टोकाचे पाऊल उचलले होते. गौतम खंडजुआ याच्या आधीच्या लग्नाबाबत घटस्फोटाची कागदपत्रे मागितल्यानंतर दोघांमध्ये वाढलेला तणाव आणि ऐन लग्नाच्या तोंडावर त्याने लग्न करण्यास दिलेला स्पष्ट नकार यांमुळे नफिसाला झालेल्या तीव्र मानसोपचाराची पार्श्वभूमी या घटनेला होती. आरोपीच्या वतीने हा केवळ लग्नास नकार असल्याचा युक्तिवाद करण्यात आला असला, तरी आत्महत्येपूर्वी निर्माण झालेली बिकट परिस्थिती आणि मानसिक कोंडी दुर्लक्षित करता येणार नाही, असे उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी स्पष्ट केले आहे. दोषमुक्तीच्या टप्प्यावर पुराव्यांची सखोल छाननी करणे आवश्यक असल्याचे सांगत न्यायालयाने याचिका फेटाळली, ज्यामुळे आता सत्य समोर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या संपूर्ण प्रकरणातून कौटुंबिक आणि वैवाहिक संबंधांमधील पारदर्शकता, भावनिक प्रामाणिकपणा आणि मानवी जीवनाचे मूल्य यावर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नात्यांमधील फसवणूक किंवा अचानक घेतलेली माघार अनेकदा संवेदनशील व्यक्तींच्या मानसिक स्वास्थ्यावरघातक आघात करू शकते. कायद्याच्या कसोटीवर या प्रकरणाची योग्य ती छाननी होऊन दोषींवर योग्य कारवाई होणे ही काळाची गरज आहे, जेणेकरून भविष्यात अशा घटनांना आळा बसेल आणि न्यायव्यवस्था अधिक भक्कम होईल.

## एमजीएमच्या गणितशास्त्र व सांख्यिकी विभागात विशेष व्याख्यान संपन्न



**छत्रपती संभाजीनगर, दि.१२ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या गणितशास्त्र व सांख्यिकी विभागात राष्ट्रीय शिक्षक दिनाचे औचित्य साधून 'राष्ट्र निर्मितीत शिक्षकांचे योगदान' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या विषयावर फॅकल्टी ऑफ बेसिक अँड अप्लाईड सायन्सच्या अधिष्ठाता डॉ.प्राप्ती देशमुख यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना डॉ.प्राप्ती देशमुख म्हणाल्या, शिक्षकांचे कार्य हे केवळ एक विद्यार्थी घडवण्यापुरते मर्यादित नसते तर ते एक कुटुंब, एक समाज आणि एक राष्ट्र घडविणाऱ्या आदर्श व्यक्तींची निर्मिती करीत असतात. शिक्षकांनी सध्याच्या काळातील नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून अद्ययावत राहणे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत राहणे आवश्यक आहे.

यावेळी विभागप्रमुख डॉ. उत्तरा देशमुख, डॉ. क्रांती झाकडे, डॉ. आशा डागर, डॉ. प्रफुल्ल शिंदे, डॉ. एम. सिद्दीकी, प्रा. करुणा घोडकी, डॉ. फिरदोज खान, डॉ. आशा नाळे, डॉ. प्रविणकुमार डोळे, सागर तायडे, अमृता डांगे, सेजल नाहर, मजेहबीन पठाण यांच्यासह विद्यार्थी व संबंधित मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थित विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## 'नमो एक्स्प्रेस' आणि विशेष बसेसच्या माध्यमातून दीड हजारांहून अधिक भाविक कोकणाकडे रवाना



मुंबई: गणेशोत्सवानिमित्त मुंबईतील चाकरमान्यांना आपल्या गावच्या बाप्पाच्या दर्शनासाठी कोकणात जाता यावे, यासाठी लोढा फाउंडेशनच्या वतीने यंदाही विशेष 'नमो एक्स्प्रेस'ची व्यवस्था करण्यात आली आहे. शनिवारी सकाळी ११ वाजून ५ मिनिटांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) येथील फलाट क्रमांक १८ वरून ही विशेष ट्रेन कोकणाकडे रवाना झाली. मुंबई भाजप अध्यक्ष तथा आमदार अमित साटम यांच्या हस्ते या विशेष रेल्वेला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. या ट्रेनमधून १५०० हून अधिक गणेशभक्तांनी सावंतवाडीपर्यंतचा प्रवास केला. सीएसएमटी स्थानकावर चाकरमान्यांनी मोठी गर्दी केली होती आणि हक्काचे आसन मिळाल्यानंतर 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.या उपक्रमाबाबत माहिती देताना मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले की, गणेशोत्सव हा प्रत्येक मराठी माणसाच्या भावविश्वाशी जोडलेला सण आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी गणेशभक्तांसाठी विशेष रेल्वे आणि बससेवेची व्यवस्था करण्यात येते, जेणेकरून मुंबईत नोकरी-व्यवसायानिमित्त राहणाऱ्या चाकरमान्यांना आपल्या कुटुंबीयांसोबत गावी सण साजरा करता येईल. विशेष बससेवा: शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता ऑगस्ट क्रांती मैदान येथून कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी ५ विशेष बसेस रवाना करण्यात आल्या. दक्षिण मुंबईतील सुमारे २०० चाकरमान्यांनी या बसमधून प्रवास करत गावाकडे प्रस्थान केले. या सर्व विशेष वाहतूक सुविधांमुळे गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास अधिक सुकर झाला. असून प्रवाशांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

# 54 व्या संयुक्त ॲग्रेस्को बैठकीत वनामकृविच्या 42 तंत्रज्ञान शिफारशीपैकी 41 शिफारशींना मान्यता

### कुलगुरु प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या नेतृत्वात शेतकरीकेंद्रित संशोधनाला मिळाले यश; पाचही वाण व चारही कृषि अवजारांच्या शिफारशींनाही मान्यता

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी



**परभणी :**-राज्यातील चारही कृषि विद्यापीठे आणि पुणे येथील महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथे दिनांक ९ ते ११ सप्टेंबर २०२६ दरम्यान ५४ वी संयुक्त कृषि संशोधन व विकास समिती (जॉइंट ॲग्रेस्को) बैठक–२०२६ आयोजित करण्यात आली. या बैठकीत राज्यातील कृषि विद्यापीठांनी विकसित केलेल्या संशोधन तंत्रज्ञानांचा आढावा घेण्यासोबतच शेतकऱ्यांसाठी उपयुक्त तंत्रज्ञान व कृषि शिफारशींवर सविस्तर विचारविनिमय करण्यात आला.

बैठकीच्या उद्‌घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. भरत गोगावले होते. महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री तथा विद्यापीठाचे प्रतिकुलपती ना. श्री. दत्तात्रय भरणे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन केले. तसेच वित्त, नियोजन, कृषि, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय आणि कामगार राज्यमंत्री ना. ॲड. श्री. आशिष जयस्वाल यांनीही समारंभात मार्गदर्शन केले.

यावेळी महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाचे सचिव डॉ. परिमल सिंह (भाप्रसे) आणि महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक श्री. राहुल महिवाल (भाप्रसे) यांची प्रमुख उपस्थिती होती. राज्यातील चारही कृषि विद्यापीठांचे कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि (वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ), डॉ. संजय भावे (डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ), डॉ. शरद गडाख (डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ) आणि डॉ. विलास खर्चे (महात्मा फुले कृषि विद्यापीठ) यांच्यासह महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक श्री. दिलीप स्वामी, कृषि परिषदेचे सदस्य श्री. विनायक काशिद, कार्यकारी परिषदेचे सदस्य तसेच विविध मान्यवर उपस्थित होते.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या संशोधन विभागाने माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि आणि संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२५–२६ या कालावधीत 'शेतकरी देवो भव' या भावनेतून शेतकरीहिताला केंद्रस्थानी ठेवून विविध क्षेत्रांत संशोधनाला चालना दिली. विविध पिके, हवामान बदल, मृदा आरोग्य, पीक संरक्षण, डिजिटल शेती, जैविक निविष्ठा आणि मूल्यवर्धन आदी विषयांवर संशोधन करण्यात आले.

या संशोधन कार्याचा अहवाल विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार यांनी संयुक्त ॲग्रेस्को बैठकीत सादर केला. यासोबतच वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या संशोधन विभागाने विविध पिकांचे वाण, पीक उत्पादन तंत्रज्ञान, कृषि अवजारे तसेच कृषि क्षेत्राशी संबंधित अन्य विषयांवरील एकूण ४२ तंत्रज्ञान शिफारशी सादर केल्या.

या ४२ शिफारशींसह वाण प्रसारणासंदर्भातील सोयाबीनची एक, आंब्याची एक आणि भाजीपाला पिकांच्या तीन अशा एकूण पाच वाणांच्या शिफारशींचा समावेश होता. तसेच कृषि अवजारांशी संबंधित चार शिफारशी सादर करण्यात आल्या.

संयुक्त ॲग्रेस्को बैठकीत सादर करण्यात आलेल्या ४२ तंत्रज्ञान शिफारशींपैकी ४१ शिफारशींना मान्यता मिळाली असून, सर्व पाच वाणांच्या तसेच चारही कृषि अवजारांच्या शिफारशींनाही मान्यता प्राप्त झाली आहे. यामुळे वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या शेतकरीकेंद्रित संशोधन कार्याला महत्त्वपूर्ण अधिमान्यता मिळाली आहे.

माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या नेतृत्वाखाली मराठवाड्यातील शेती आणि शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन विविध विषयांवर विकसित करण्यात आलेल्या या तंत्रज्ञान शिफारशी आधुनिक, उपयुक्त आणि शाश्वत कृषि पद्धतींच्या प्रसारासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. विशेषतः हवामान बदल, वाढता उत्पादन खर्च, कीड व रोगांचा वाढता प्रादुर्भाव आणि बदलती बाजारपेठ या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर या तंत्रज्ञानांचा शेतकऱ्यांना मोठा लाभ होईल.

कृषि संशोधन अधिकाधिक शेतकरीकेंद्रित, हवामान-अनुकूल, आधुनिक आणि शाश्वत करण्याच्या दृष्टीने या मान्यतांना विशेष महत्त्व आहे. या तंत्रज्ञान शिफारशींच्या माध्यमातून मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षमतेत, उत्पन्नात आणि शेतीच्या शाश्वततेत सकारात्मक बदल घडवून आणण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि आणि संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार यांनी व्यक्त केला.

या बैठकीमध्ये विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे, सर्व विविध महाविद्यालयांचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख, विविध संशोधन प्रकल्पांचे समन्वयक तथा मुख्य शास्त्रज्ञ यांनी सहभाग घेवून सबंधित विषयांचे सादरीकरण केले. वनामकृविच्या शास्त्रज्ञांच्या बैठकीतील सहभागासाठी संशोधन उपसंचालक डॉ. रणजीत चव्हाण, डॉ. सुनिता पवार, डॉ. प्रभाकर पडघन, संशोधन संचालनालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

वाण प्रसारण

**१. सोयाबीन :** एमएयूएस ७९१

सोयाबीन पिकाचा वाण एमएयूएस ७९१ हा स्थानिक व राष्ट्रीय तुल्यबळ वाणांपेक्षा उत्पादनात सरस आढळून आला आहे. हा वाण विविध कीड व रोगास मध्यम प्रतिकारक आढळून आला असून, एमएयूएस ७९१ या वाणाची महाराष्ट्र राज्यात लागवडीसाठी प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२. आंबा – राजकेशर (FRSMC-1)

नियमित फलधारणा, लवकर फुलोरा व फलधारणा, कमी पीक कालावधी, आकर्षक रंग, अधिक फळे व उत्पादन, चवीला गोड आणि अधिक टिकवण क्षमता असणारा आंब्याचा "FRSMC-1" हा वाण "राजकेशर" या नावाने मराठवाडा विभागात लागवड करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३. खरबूज, परभणी खरबूज (VNMKVMH-1)

परभणी खरबूज (VN-MKVMH-1) हा अर्धवट जाळीदार, कुरकुरीत व फिकट नारंगी जाडगर आणि एकसारखी लंबवर्तुळाकार फळे असणारा, अधिक उत्पादन देणारा व लांब पल्ल्याच्या बाजारपेठेसाठी उपयुक्त वाण आहे. या वाणाची मराठवाडा विभागात लागवडीसाठी प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. परभणी दुधी भोपळा

परभणी दुधी भोपळा (LTRBG-3x4) हा मध्यम वाढीचा, कडू नसलेली, लांब, सरळ आणि एकसारखी दंडगोलाकार फळे असणारा, अधिक उत्पादन देणारा व लांब पल्ल्याच्या बाजारपेठेसाठी उपयुक्त वाण आहे. या वाणाची मराठवाडा विभागात लागवडीसाठी प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

५. परभणी कारली

परभणी कारली (VNM-KVBGH-01) फळे ही गडद हिरव्या चमकदार रंगाची असून ती मध्यम आकाराची व दोन्ही टोकांना निमुळती आणि त्यांच्यावरील शिरा हे तुटक पण आकर्षक फळे असणारा, अधिक उत्पादन व लांब पल्ल्याच्या बाजारपेठेसाठी उपयुक्त वाण आहे. या वाणाची मराठवाडा विभागात लागवडीसाठी प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

कृषी औजारे व यंत्र प्रसारण

१. पशुधन धुणे यंत्र

वनामकृवि विकसित पशुधन धुणे यंत्राच्या वापरामुळे पशुधन धुतल्यामुळे त्यांची स्वच्छता, उत्पादन व कार्यक्षमता वाढते. शेण आणि घाण ८९% कमी होते, बाह्यपरजीवींचे निर्मूलन ९५% होते, पाणी आणि मनुष्यबळाची बचत ५०% होते आणि या सर्व गोष्टींचा एकूण परिणाम पशुधनावर सरासरी ४५% या यंत्राच्या सहाय्याने बैलांस उन्हाळ्यात दररोज, पावसाळ्यात आठवड्यातून दोनदा, गायींसाठी उन्हाळ्यात दररोज, पावसाळ्यात एक दिवसाआड आणि हिवाळ्यात आठवड्यातून दोनदा, तसेच म्हशींसाठी उन्हाळ्यात दररोज दोनदा, पावसाळ्यात एक दिवसाआड आणि हिवाळ्यात दररोज धुण्याची शिफारस गोशाळाचालक व पशुपालक शेतकऱ्यांना करण्यात येते.

२. बैलचलित बहुपीक टोकण व स्लरी टाकणे यंत्र

वनामकृवि विकसित बैलचलित बहुपीक टोकण व स्लरी टाकणे (सोबत रेखाचित्र) यंत्राचा वापर हरभरा व रब्बी ज्वारीवर एकाचवेळी पेरणी आणि स्लरी टाकण्यासाठी वापरल्यामुळे बियाण्यामध्ये ५० टक्के, मनुष्यबळात व एकूण मशागतीवर ४६ टक्के बचत झाल्याचे आढळून आले. म्हणून सेंद्रिय शेती करणाऱ्या लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना वापरण्याची शिफारस करण्यात येते.

३. पशुधनास खरारा करणे यंत्र

वनामकृवि विकसित पशुधनास खरारा करणे यंत्राच्या वापरामुळे मोठ्या पशुधनाची स्वच्छता आणि आराम सुधारून त्यांचे उत्पादन व कार्यक्षमता वाढते. शेण आणि डाग ९१%, बाह्यपरजीवी ८८%, आजारी पडण्याचे प्रमाण ८२% कमी होते. या सर्व गोष्टींचा एकूण चांगला परिणाम पशुधनावर सरासरी ३६% आढळतो. या यंत्राच्या सहाय्याने बैलांस उन्हाळ्यात आठवड्यातून दोनदा, पावसाळ्यात एक दिवसाआड आणि हिवाळ्यात दररोज, तसेच गायींसाठी उन्हाळ्यात दररोज, पावसाळ्यात एक दिवसाआड आणि हिवाळ्यात आठवड्यातून दोनदा, आणि म्हशींसाठी उन्हाळ्यात व पावसाळ्यात आठवड्यातून दोनदा आणि हिवाळ्यात एक दिवसाआड खरारा करण्याची शिफारस गोशाळा व पशुपालक शेतकऱ्यांसाठी करण्यात येते.

४. अर्ध-स्वयंचलित चारा व खुराक वहनयंत्रणा

वनामकृवि विकसित अर्ध-स्वयंचलित चारा व खुराक वहनयंत्रणा जनावरांना वाळलेला, हिरवा चारा व खुराक देण्यामध्ये मनुष्यबळात ५० टक्के, वेळेत ९३ टक्के आणि चारा नासाडीमध्ये ४४ टक्के पारंपरिक पद्धतीच्या तुलनेत बचत होत असल्यामुळे सहा जनावरांपर्यंतच्या लहान दुग्धव्यवसायिक आणि पशुपालकांसाठी शिफारस करण्यात येते.

# हरतालिका तृतीया पूजा साहित्य: घरातच पूजनाची तयारी करताय? 'या' वस्तू आणायला अजिबात विसरू नका!

हरतालिका तृतीया हा अखंड सौभाग्य आणि पतीच्या उदंड आयुष्यासाठी मानला जाणारा अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा सण आहे. भाद्रपद महिन्याच्या शुद्ध तृतीयेला हे व्रत केले जाते, ज्यामध्ये महिला आणि कुमारिका कडक उपवास ठेवून भगवान शिव आणि माता पार्वतीची मनोभावे पूजा करतात. पौराणिक कथेनुसार, माता पार्वतीने महादेवाला पतीरूपात मिळवण्यासाठी जंगलात जाऊन कठोर तपश्चर्या केली होती आणि याच दिवशी शंकराने त्यांचा स्वीकार केला होता. निष्ठा, भक्ती आणि त्यागाचे प्रतीक असलेल्या या व्रताची पूजा कशी करावी आणि त्यासाठी कोणते साहित्य लागते, याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

**हरतालिका तीज :** हरतालिका तीज हा विवाहित महिलांसाठी महत्त्वाचा सण मानला जातो. यंदा १४ सप्टेंबर २०२६ रोजी गणेश चतुर्थीसोबत हरतालिका तीज येत आहे. या दिवशी महिला भगवान शिव आणि माता पार्वतीची पूजा करून पतीच्या दीर्घायुष्यासाठी व्रत करतात.

**शिव-पार्वतीच्या मूर्ती :** हरतालिका तीजच्या पूजेसाठी शिव, पार्वती आणि भगवान गणेशाच्या मातीच्या किंवा वाळूच्या प्रतिमा तयार केल्या जातात. पूजा झाल्यानंतर या प्रतिमांचे विसर्जन करण्याची परंपरा आहे.

**सौभाग्याचे साहित्य आणि पूजेचे साहित्य :** पूजेसाठी लाल चुनरी, बिंदी, बांगड्या, मेहंदी, सिंदूर, कुंकू, काजळ, कंगवा, जोडवी, पैंजण यांसारखे सौभाग्याचे साहित्य ठेवले जाते. या साहित्याला पूजेमध्ये विशेष महत्त्व असते. रोळी, अक्षता, हळद, चंदन, मौली, कापूर, कापूस, उदबत्ती, तुपाचा दिवा आणि माचिस यांसारख्या वस्तू पूजेसाठी



आवश्यक असतात.भगवान शिवाच्या पूजेसाठी बेलपत्राला विशेष महत्त्व आहे. यासोबत फुले, फुलांच्या माळा, दूर्वा आणि शमीची पानेही पूजेसाठी ठेवली जातात.

**नैवेद्याचे साहित्य :** पूजेसाठी फळे, मिठाई, खीर, हलवा आणि भिजवलेले हरभरे यांचा नैवेद्य दाखवला जातो. आपल्या परंपरेनुसार नैवेद्याच्या पदार्थांमध्ये बदल केला जाऊ शकतो.

**कलश आणि जल :** पूजेसाठी कलश, स्वच्छ पाणी आणि गंगाजल ठेवले जाते. कलशासोबत नारळ आणि पूजेसाठी आवश्यक इतर साहित्याचीही तयारी केली जाते. शिव-पार्वतीच्या पूजेसाठी पंचामृत तयार केले जाते. यासाठी दूध, दही, मध, साखर आणि तूप या पदार्थांचा वापर केला जातो. पूजेसाठी पान, सुपारी, कच्ची हळदीच्या गाठी, गहू किंवा तांदूळ आणि कच्चा सूत यांसारखे साहित्यही आवश्यक असते.पूजेसाठी चौकी किंवा आसन तयार केले जाते. मंडपासाठी केळीची पाने आणि सजावटीसाठी फुले वापरली जातात. पूजा सुरू करण्यापूर्वी सर्व साहित्य व्यवस्थित मांडून ठेवणे सोयीचे ठरते.

**हरतालिका व्रताचे नियम :** हरतालिका तीजचे व्रत अनेक महिला निर्जला ठेवतात. म्हणजेच या दिवशी अन्न आणि पाणी ग्रहण केले जात नाही. मात्र, आरोग्याच्या दृष्टीने उपवास करण्यापूर्वी स्वतःच्या प्रकृतीचा विचार करणे महत्त्वाचे आहे. हरतालिका तीजच्या दिवशी रात्री जागरणाला धार्मिक महत्त्व दिले जाते. तसेच शिव-पार्वतीची पूजा केल्यानंतर हरतालिका तीजची कथा ऐकण्याची परंपरा आहे. दुसऱ्या दिवशी सूर्योदयानंतर व्रत सोडले जाते.

# शाडू मातीच्या गणेशमूर्ती कार्यशाळेला 300 विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश; विद्यार्थ्यांनी स्वतः साकारल्या विविध रूपांतील गणेशमूर्ती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेश घराघरांत पोहोचविण्याच्या उद्देशाने विघ्नहर्ता गणेश मंदिर, एन-३, सिडको तसेच आनंद विद्या मंदिर आणि एमआयटी शाळा, एन-४, सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने शाडू मातीच्या गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्वतःच्या हाताने विविध आकारांच्या सुबक गणेशमूर्ती साकारल्या.




कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रशिक्षकांसह उपस्थित मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. त्यानंतर ज्येष्ठ कलावंत तथा प्रशिक्षक सुधीर कोर्टीकर आणि महिला प्रशिक्षक सुवर्णा शेळके यांनी विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिक देत मार्गदर्शन केले. प्रशिक्षकांनी स्वतःही गणेशमूर्ती साकारून विद्यार्थ्यांना बारकावे समजावून सांगितले.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी बालगणेश, जय मल्हार गणेश, मोदकप्रिय गणेश, बोधिवृक्ष गणेश अशा विविध संकल्पनांवर आधारित गणेशमूर्ती तयार केल्या. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या कलाकृती पाहून शिक्षकांनीही उत्साहाने मूर्ती तयार केल्या. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला मिळालेल्या या व्यासपीठामुळे संपूर्ण वातावरणात उत्साह निर्माण झाला होता.

गणेशोत्सवाच्या पारंपरिक उत्सवासोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. शाडू मातीच्या मूर्ती तयार करण्याची प्रत्यक्ष कृती विद्यार्थ्यांनी अनुभवल्याने पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्व त्यांना अधिक प्रभावीपणे समजले. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून हा संदेश त्यांच्या कुटुंबांपर्यंत आणि पुढे समाजापर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे. या उपक्रमाच्या आयोजनात युवक उद्योजक उदय देशपांडे, प्रतीक शिरसे, वानखेडे सर, गणेश मालोदे सर, मुसळे सर, अनिल घुगे सर, वनिता तिवसकर ताई, ओम लहाने यांच्यासह अनेक शिक्षक व कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. विघ्नहर्ता गणेश मंदिराचे विश्वस्त अनिल भालेराव, व्ही. जी. कुलकर्णी आणि गजानन देशमुख यांच्या सहकार्यामुळे कार्यशाळा उत्साहात पार पडली.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# प्रभावती पतसंस्थेच्या अध्यक्षपदी ज्ञानेश्वर शिंदे, उपाध्यक्ष पदी रामभाऊ गिधाने बिनविरोध



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**बिडकीन प्रतिनिधी, दि. १२ सप्टेंबर :** पैठण तालुक्यातील चितेगाव येथील प्रभावती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., चितेगावच्या पंचवार्षिक निवडणुकीनंतर अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवडणूक दि. ९ सप्टेंबर रोजी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. पैठण सहाय्यक निबंधक कार्यालयाच्या निवडणूक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या निवडणुकीत अध्यक्षपदी ज्ञानेश्वर उत्तम शिंदे, तर उपाध्यक्षपदी रामभाऊ दगडू गिधाने यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवड झाल्यानंतर निवडणूक अधिकारी बलराम नवथार यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्षांना नियुक्तीपत्र प्रदान केले. तसेच पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रभावती पतसंस्थेचे सर्व संचालक व कर्मचारी उपस्थित होते. त्यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे व उपाध्यक्ष रामभाऊ गिधाने यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

# हेल्मेट, नशामुक्ती अन् डीजेमुक्तीचा संकल्प; गणेशोत्सवाला समाजाभिमुख उपक्रमांची जोड

## जिल्हा श्री गणेश महासंघाचा निर्धार; 14 सप्टेंबरपासून विविध कार्यक्रमांना सुरुवात

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील वाढते अपघात, नशाखोरी आणि कर्णकर्कश डीजेच्या आवाजावर प्रतिबंध घालण्यासाठी यंदाचा गणेशोत्सव 'हेल्मेट सक्ती, नशामुक्ती आणि डीजेमुक्ती' या संकल्पाने साजरा करण्याचा निर्धार जिल्हा श्री गणेश महासंघाने केला आहे. महासंघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष हरिभाऊ हिवाळे आणि संस्थापक अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते पृथ्वीराज पवार यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत ही भूमिका स्पष्ट केली.

१०२ वर्षांची परंपरा असलेल्या जिल्हा श्री गणेश महासंघाच्या वतीने यंदा गणेशोत्सवाला विविध समाजाभिमुख उपक्रमांची जोड देण्यात आली आहे. महासंघाच्या




नूतन कार्यकारिणीची घोषणाही यावेळी करण्यात आली. माजी अध्यक्ष अभिजित देशमुख, राजू शिंदे, डी. एन. पाटील, डॉ. बाळासाहेब थोरात, किशोर तुळशीबागवाले, अनिकेत निल्लावार यांच्यासह कार्याध्यक्ष राजू बागडे, लक्ष्मीनारायण बाखरिया, तनसुख झांबड, कृष्णा बनकर, राजेश मेहता, महेश उबाळे, प्रा. मनोज पाटील, प्रमोद ठेंगडे, सुरेश टाक, दिनेश राजेभोसले, संदीप शेळके, हरीश शिंदे आणि प्रसिद्धी प्रमुख सचिन लिला सुखदेव अंभोरे उपस्थित होते.सोमवार, १४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता निराला बाजार येथील महासंघाच्या मध्यवर्ती कार्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत श्री गणेशाची स्थापना करण्यात येणार आहे. त्यानंतर मंगळवारी, १५ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत शहरातील महापुरुषांच्या स्मारकांची स्वच्छता केली जाणार आहे. क्रांती चौक येथील शिवस्मारकाला अभिवादन करून या उपक्रमाची सुरुवात होईल.

गणेशोत्सवानिमित्त महालक्ष्मी सजावट स्पर्धा ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार आहे. यासाठी ९९२१३१९१२१ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शनिवारी, १९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता विभागीय क्रीडा संकुल येथे भव्य कबड्डी स्पर्धा होणार आहे. रविवारी, २० सप्टेंबर रोजी संभाजी पेठेतील जिल्हा परिषद मैदानावर दुपारी १ वाजता अस्सल मातीतील भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी, २१ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता निराला बाजार येथील तापडिया नाट्य मंदिराच्या प्रांगणात भव्य रांगोळी स्पर्धा होणार आहे. मंगळवारी, २२ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता क्रांती चौक येथे सायकल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पारंपरिक गणेशोत्सवाची परंपरा कायम ठेवतानाच सामाजिक संदेश देणारे उपक्रम राबविण्यावर महासंघाने यंदा भर दिला आहे.

जिल्हा श्री गणेश महासंघाच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन रविवारी, १३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता निराला बाजार येथे खासदार संदीपान भुमरे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते पृथ्वीराज पवार राहणार आहेत. पालकमंत्री संजय शिरसाट, मंत्री अतुल सावे, माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, खासदार डॉ. कल्याण काळे, चंद्रकांत खैरे, आमदार प्रदीप जैस्वाल, अनुराधा चव्हाण यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी आणि अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

यावेळी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, मनपा आयुक्त अमोल येडगे आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पी. एम. मिन्नू यांचीही उपस्थिती राहणार आहे. कार्यालयाच्या उद्घाटनासाठी गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष हरिभाऊ हिवाळे आणि पृथ्वीराज पवार यांनी केले आहे.

# हप्तेखोर अधिकाऱ्यामुळेवाळू माफियाचा महसूल कर्मचाऱ्यावर प्राणघातक हल्ला

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :-** परभणीचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक पंकज कुमार यांनी जिल्ह्यात अनेक ठिकाणी धाडी टाकून वाळू माफिया वर जरब बसवली होती व अनेक माफियाचे तराफे जाळून टाकण्यात आले होते परंतु महसूल विभागाच्या काही अधिकाऱ्यांनी वाळू माफीयाशी संगणमत करून आपापल्या सवलतीनुसार हप्ते घेऊन वाळू माफ्यावर डोळे झाकपणा केला म्हणून वाळू माफियाची मजल थेट कर्मचाऱ्यांच्या जीवावर बेतत आहे असाच एक प्रकार गोदावरी नदीच्या पातळीत होत असल्यावर दळून उपशावर कारवाईसाठी गेलेल्या महसूल कर्मचाऱ्यांच्या पथकावर जीवघेनाहल्ला करत जबर मारहाण करण्यात आली पथकातील कर्मचाऱ्यांचे कपडे काढून लोकांनी वेळूच्या बांबूने व लोखंडी रॉडणे मारहाण करून प्राणघातक हल्ला करण्यात आल सदरील घटना 11 सप्टेंबर दुपारी चार ते सायंकाळी सहाच्या दरम्यान घडली सदरील प्रकरणी पालन पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून महसूल विभागाच्या हप्तेखोर अधिकाऱ्यांमुळे वाळू माफियांना अधिकाऱ्यांची भीतीच राहिली नाही अधिकाऱ्यांसोबत असलेले वित्त हितगुजामुळे बाकी कर्मचाऱ्यांना त्यांनी धुडकावून लावत महसूल कर्मचारी व सेवकावर जीवघेणा हल्ला केल्याची चर्चा सर्वसामान्य जनतेमध्ये ऐकावयास मिळत आहे पालम तहसील कार्यालयातील महिपती कांबळे पुणे किरबाज तू तर संजय चव्हाण रंगनाथ शेट्टेवाड प्रकाश राय भोळे नयन राठोड देवानंद शिनगारे लक्ष्मण जाधव यांचे पथक वाहनाने कुर्लेवाडी शिवारात कारवाई साठी गेले होते

या ठिकाणी त्यांना वाळूमाफीचे तराफे दिसले व त्यांनी त्या पथकाने वाळू उपसाचे तराफे नष्ट केले या कार्यवाहीदरम्यान कुरलेवाडी येथील काही जणांनी या पथकासोबत या पथकातून वाद घालण्यास सुरुवात केली त्यातील एकाने स्वतःच्या अंगावर पेट्रोल ओतले दुसऱ्याने आग लावली पथकातील कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत सदर इसमाला नदीच्या पात्रात ढकलल्याने आग विझली या इसमाचा जीव वाचवल्यानंतर त्याच इसमानी महसूल कर्मचाऱ्यांच्या पथकाला जबरन मारहाण केली व कर्मचाऱ्यांना नदीच्या वरच्या बाजूला असलेल्या मंदिराकडे नेऊन बसवले आम्ही तुम्ही आमचे तराफेची तोडफोड का केली असे म्हणत लोखंडी रोडने लाट्या काठ्यानी प्राणघातक हल्ला करण्याचे उद्देशाने मारहाण केली याच दरम्यान पालम पोलिसांचे पथक घटनास्थळी येत असल्याचे पाहून संबंधित व्यक्ती घटनास्थळावरून पसार झाले सदरील प्रकरणी महसूल सेवक महिपती कांबळे यांच्या फिर्यादीवरून अक्षय कदम आकाश आळनुरे तिरुपती अलनुरे प्रकाश कदम अनिल गायकवाड संतोष शिंदे रोकडोबा शिंदे महेश कदम व इतर अनोळखी व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कार्यवाहीकरून पोलीस तपास करत आहेत.

# जिंतूर येलदरी सेनगाव हा रस्ता होणार सीमेंट कॉंक्रिटचा



**जिंतूर :** एशियन डेव्हलमेंट बँक (ADB) या योजने अंतर्गत जिंतूर मतदार संघातील जिंतूर येलदरी सेनगाव रस्त्याची सुधारणा करणे ( किमी ५५/६०० ते ७०/६००) या कामास तब्बल ३४० कोटी रुपये मंजूर करण्यात आलेले असून सदरील रस्ता हा सीमेंट कॉंक्रिट चा होणार असून यात ३४ किमी लांबी समाविष्ट करण्यात आली आहे.

यामध्ये जिंतूर ते येलदरी या रस्त्याची दयनीय अवस्था लक्षात घेता आणि हाच महामार्ग पुढे मराठवाडा आणि विदर्भाशी जोडणारा महत्वाचा महामार्ग असल्याने प्राधान्याने हा रस्ता पूर्ण करण्यात येणार असून पुढील येलदरी ते सेनगाव रस्त्याचे काम यापूर्वीच पूर्ण झाले असल्याने या कामा ऐवजी उर्वरित १९ किमी लांबीचा सुधारीत रस्ता रामा २४८ सावंगी म्हाळसा सावली इटोली पोखरणी तांडा चिंचोली दराडे वस्सा आसेगाव दुधगाव प्रजिमा ७ प्रस्तावित करून महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री आदरणीय मा.नामदार मेघना साकोरे बोर्डीकर यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री मा.ना.श्री.शिवेंद्रराजे भोसले यांची मंत्रालय मुंबई येथे प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना या सुधारित कामाचे निवेदन दिले आणि या संदर्भात मा.मंत्री महोदय यांनी या बाबत तत्काळ कामाचा सर्व्हे करण्यात येणार असून DPR (Detils Project Report) तयार करून अंदाजपत्रक सादर करण्यात येणार असल्याचे आश्वस्त करून संबंधित विभागास लवकर कार्यवाही करण्या बाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

# दशलक्षण पर्व निमित्त वेरुळ गुरुकुल मध्ये भव्य तत्वार्थ सूत्र महामंडळ विधान आयोजन

**छत्रपती सभाजीनगर :** पार्श्वनाथ ब्रह्मचर्या श्रम जैन गुरुकुल मध्ये जैन धर्मीयांचा सर्व श्रेष्ठ धार्मिक पर्व म्हणून दक्षलक्षण महापर्व प्रख्यात आहे.दिनांक 16 सप्टेंबर ते 26 सप्टेंबर पर्यंत वेरूळ गुरुकुल मध्ये या पर्वाचे साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमात दिनांक 15 रोजी मंडप शुद्धी घट यात्राचे आयोजन करण्यात येणार आहे तर दिनांक 16 पासून दररोज सकाळी 6.00 वाजता अभिषेक पूजन बोल्या करण्यात येणार आहे.याच निमित्ताने या दश दिवसात तत्वार्थ सूत्र महामंगल विधानाचे आयोजन केले. तसेच परम पूज्य 108 नियम सागर महाराज व सुपार्शसागर महाराज यांच्या मंगल प्रवचनाचे देखील दररोज दुपारी 3.00 आयोजन करण्यात आले आहे. दिनांक 19 सप्टेंबर रोजी पुष्पदंत भगवान मोक्ष कल्याणक निमित्ताने तसेच दिनांक 25 सप्टेंबर रोजी वासपूज्य भगवान मोक्ष कल्याणक निमित्ताने भव्य निर्वाण लाडू चढविण्यात येईल.दिनांक 26 रोजी विश्व शांती हेतुन होम हवन करण्यात येणार आहे. बाहेरून येणाऱ्या सर्व भाविकांची यावेळी निवास व शुद्ध भोजन व्यवस्था करण्यात येणार आहे. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन बाल ब्रह्मचारी मनीष भैय्या यांच्या मार्गदर्शनात करण्यात येणार आहे.तरी या कार्यक्रमासाठी सकल जैन समाजानी उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे मार्गदर्शक वर्धमान पांडे अध्यक्ष दिनेश गंगवाल महामंत्री प्रेमचंद पाटणी सहसचिव गौतम ठोले कोषाध्यक्ष सुमित ठोले मदनलाल पांडे निर्मलकुमार ठोले गुलाबचंद बोराळकर पर्यवेक्षक सुकुमार नवले यांनी केले आहे अशी माहिती अतुल बांदे सुहास मिश्रीकोटकर पियूष कासलीवाल नरेंद्र अजमेरा यांनी दिली.

# शेती आणि निसर्गाशी असलेले नाते जपणारा बैलपोळा साजरा

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :-**माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी बैलपोळ्यानिमित्त शेतकरी बांधवांना दिल्या शुभेच्छा

महाराष्ट्रातील शेतकरी संस्कृतीतील महत्त्वपूर्ण सण असलेल्या बैलपोळ्यानिमित्त वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र आणि कृषि विद्या विभागासह विद्यापीठाच्या विविध प्रक्षेत्रीय कार्यालयांमध्ये दिनांक १० सप्टेंबर २०२६ रोजी बैलपोळा सण उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने विद्यापीठ परिसरातील बैलांना स्वच्छ धुऊन, रंगीबेरंगी कापड, गोंडे व मणीमाळांनी आकर्षक सजावट करण्यात आली. तसेच बैलांच्या शिंगांना विविध रंग लावून



पारंपरिक पद्धतीने त्यांचे पूजन करण्यात आले.

यावेळी माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी सांगितले की, शेती, बैल, पाऊस, जमीन आणि निसर्ग यांचा परस्परांशी अतिशय घट्ट संबंध आहे. बैलपोळ्याच्या माध्यमातून शेतकरी निसर्गाशी असलेले आपले नाते जपण्यासोबतच शेतीच्या कामात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करतात. शेतीच्या कामात तसेच शेतकऱ्यांच्या जीवनात बैलांचे महत्त्वपूर्ण स्थान असून, त्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले. बैलपोळ्यानिमित्त त्यांनी सर्व शेतकरी बांधवांना शुभेच्छा दिल्या.

पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र आणि कृषि विद्या विभागात अधिष्ठाता डॉ. प्रवीण वैद्य यांच्या हस्ते बैलांचे पूजन करून त्यांना नैवेद्य खाऊ घालण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पशुसंवर्धन विभागातील डॉ. नरेंद्र कांबळे, डॉ. शंकर नरवाडे, डॉ. दत्ता बैनवाड, श्री. शैलेश मुंडे, श्री. प्रशांत गटशिरले, श्री. सोनटक्के, श्री. परमेश्वर गायकवाड तसेच कृषि विद्या विभागातील डॉ. मेघा जगताप, डॉ. प्रशांत जाधव, डॉ. आशा चव्हाण, डॉ. ज्योती गायकवाड, श्री. शहाजी ढोले यांच्यासह दोन्ही विभागांतील विद्यार्थी व मजूर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. याबरोबरच विद्यापीठाच्या मुख्यालयासह कार्यक्षेत्रातील विविध कार्यालये व प्रक्षेत्रांमध्येही बैलपोळा सण उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

# मोतीबिंदुमुळे अंधत्व अनुभवलेल्या वृध्द नेत्ररुग्णांनी केला नेत्रदानाचा संकल्प



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१२ सप्टेंबर :** राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा दि. 25 ऑगस्ट ते 8 सप्टेंबर 2026 निमीत्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कमलाकर मुदखेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा नेत्रशल्यचिकित्सक डॉ.अर्चना भडीकर यांच्या मार्गदर्शक उपस्थिती पंधरवडाच्या शेवटच्या दिवशी म्हणजे 8 सप्टेंबर रोजी जिल्हा रुग्णालय चिकलठाणा येथील नेत्रविभागात सोयगाव,आळंद,बाबरा,वडोद बाजार येथील नेत्ररुग्णांची नेत्रशस्त्रक्रिया करण्यात आली यासाठी नेत्रशल्यचिकित्सक डॉ.संतोष काळे,डॉ.विभा भिवटे,डॉ.स्नेहल सुर्यवंशी,डॉ.आमेर काद्री यांनी विशेष परिश्रम घेतले तसेच याप्रसंगी नेत्रचिकित्सा अधिकारी सुहासिनी जावळे यांनी नेत्रदानासंबंधित समज, गैरसमज,प्रक्रिया याबाबत माहिती देत शंका दुर केल्या, सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी जिल्हा नेत्रशल्यचिकित्सक डॉ.अर्चना भडीकर यांच्या नेत्रदान संमतीपत्र भरण्याच्या आवाहाना नंतर उपस्थितीत रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी नेत्रदानाची शपथ घेत नेत्रदान संमतीपत्र भरुन दिले.योगेश सोनटक्के,तुषार भालेराव, आसिया शेख सुलताना,प्रशिक्षनार्थी डॉ.गणेश शिंगे,इनचार्ज वृषाली डोईफोडे,सुनिता म्हस्के,मधुरानी उगले,सचिन उगले, सुलोचना बुरुंगे,चंद्रकला झरेकर,शीला तुपे व रुग्णांलयातील इतर कर्मचारी यांनी विशेष सहकार्य करत सप्ताह समाप्ती कार्यक्रम यशस्वी केला.

# कुणबी जात प्रमाणपत्रासाठी विशेष शिबिरात आज 67 अर्ज प्राप्त

**छत्रपती संभाजीनगर, दि. १२ (जिमाका)-:** जिल्ह्यात कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र वितरणासाठी आज आयोजीत ११ विशेष मंडळस्तरीय शिबिरांमध्ये एकूण ६७ अर्ज प्राप्त झाले असल्याची माहिती महसूल यंत्रणेने दिली आहे. आज जिल्ह्यात कांचनवाडी, शेकटा ता. छत्रपती संभाजीनगर, पैठण, पिंपळवाडी ता. पैठण, वेरुळ ता. खुलताबाद, हतनूर, चिकलठाण ता. कन्नड, हर्सूल, डोणगाव ता. गंगापूर, खंडाळा, बोरसर ता, वैजापूर अशा ११ ठिकाणीही शिबिरे झाली.

छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील शिबिरात ११, वैजापूर तालुक्यात १०, गंगापूर तालुक्यात ३, कन्नड तालुक्यात १९, खुलताबाद तालुक्यात २४ असे एकूण ६७ अर्ज प्राप्त झाले.

या प्रस्तावांची ऑनलाइन प्रक्रिया बाकी असून, तालुकास्तरीय वंशावळ समितीच्या बैठकीत निर्णय झाल्यानंतर तातडीने पुढील कार्यवाही करून अर्ज निकाली काढण्यात येणार आहे.

# भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती: महाडीबीटी 1.0 पोर्टल सुरु

**छत्रपती संभाजीनगर, दि.१२(जिमाका)- :** सामाजिक न्याय विभागामार्फत भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते, या योजनेची प्रक्रिया सुलभ होण्यासाठी महाडीबीटी १.० पोर्टल सुरु झाले आहे. या पोर्टलवरील अर्ज तात्काळ निकाली काढण्याबाबतचे आवाहन सर्व संबंधित प्राचार्यांना सहाय्यक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी केले आहे. सन २०२५-२६ व त्यापुर्वीचे अनु.जाती प्रवर्गातील विदयार्थ्यांचे महाविद्यालयस्तरावरील व विद्यार्थीस्तरावरील प्रलंबित अर्ज जिल्हयातील सर्व शासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कनिष्ठ, वरिष्ठ, व्यावसायिक, बिगर व्यावसायिक, महाविद्यालयातील प्राचार्यांनी प्रलंबित असलेले पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज तात्काळ दोन दिवसात फॉरवर्ड करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त डॉ.अनिता राठोड यांनी केले आहे.

# रोजगार महाकुंभ; जिल्ह्यात 21 ठिकाणी भरती मेळावे

**छत्रपती संभाजीनगर, दि.१२(जिमाका)- :** राज्यातील युवकांना रोजगार, स्वयंरोजगार, कौशल्य विकास आणि उद्योजकतेच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने "रोजगार महाकुंभ महाराष्ट्र २०२६" हा उपक्रम संपूर्ण राज्यात मंगळवार दि.२९ रोजी आयोजीत करण्यात आला आहे. या उपक्रमात अधिकाधिक युवक- युवतींनी सहभागी व्हावे,असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त.राजु वाकुडे यांनी केले आहे.

# साहेबराव शेळके यांची शिवना ग्रामपंचायत प्रशासकपदी निवड

## पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांच्या हस्ते सत्कार; ग्रामविकासाला मिळणार नवी दिशा

**शिवना, ता. सिल्लोड :** शिवना ग्रामपंचायतीच्या प्रशासकपदी विस्तार अधिकारी साहेबराव शेळके यांची निवड करण्यात आली आहे. प्रशासकपदी निवड झाल्याबद्दल पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन साहेबराव शेळके यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी शेख सलीम यांनी साहेबराव शेळके यांचे अभिनंदन करून त्यांच्या प्रशासकीय कार्यास शुभेच्छा दिल्या. शिवना ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावातील विकासकामांना अधिक गती मिळावी,



नागरिकांच्या मूलभूत सुविधांचे प्रश्न प्राधान्याने सोडविले जावेत आणि शासनाच्या विविध योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

शिवना गावाच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायत प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थ यांच्यात समन्वय राहणे आवश्यक असून, त्यातून गावातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

प्रशासक म्हणून साहेबराव शेळके यांच्या अनुभवाचा ग्रामपंचायतीच्या कामकाजाला निश्चितच फायदा होईल. गावातील स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, पथदिवे, घरकुल योजना तसेच विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीला चालना मिळण्याची अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

या सत्कार प्रसंगी माजी सरपंच डॉ. सलमान खान, अरुण काळे, माजी सरपंच इस्माईल कुरेशी, विनायक काटकर, योगेश सपकाळ, राजिक सेठ, शामराव होळकर, कदिर आभा, ताजू सेठ, खुर्रम चाऊस, इमरान मोमिन, विनोद जगताप यांच्यासह ग्रामस्थ व नागरिक उपस्थित होते.

उपस्थितांनी साहेबराव शेळके यांचे अभिनंदन करून त्यांच्या प्रशासकीय कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# जिंतूरमध्ये मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर; 95 रुग्णांची नोंदणी; 70 रुग्ण शस्त्रक्रियेसाठी उदगीरला रवाना

**जिंतूर :** ता. १२(बातमीदार )स्व. गिरिधारीलाल तोष्णीवाल यांच्या तेराव्या पुण्यस्मरणानिमित्त स्वर्गीय आयोध्याबाई रामनारायणजी तोष्णीवाल चॅरिटेबल ट्रस्ट आणि उदयगिरी लायन्स नेत्र रुग्णालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने जिंतूर शहरातील जिजामाता विद्यालयात ता. १२(शनिवार ) रोजी मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराला ग्रामीण भागातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात एकूण ९५ रुग्णांची नेत्र तपासणी व नोंदणी करण्यात आली असून त्यापैकी ७० रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. या रुग्णांना पुढील मोफत उपचार व शस्त्रक्रियेसाठी उदगीर येथील लायन्स नेत्र रुग्णालयात पाठविण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संदीप भाई शर्मा महाराज होते. चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ब्रिजगोपालजी तोष्णीवाल, प्रमुख पाहुणे म्हणून वैजनाथ आप्पा एकशिंगे तसेच मुख्याध्यापक मनोहर कदम यांची उपस्थिती होती. यावेळी ट्रस्टच्या वतीने सामाजिक बांधिलकीतून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली.यावेळी ब्रिजगोपालजी तोष्णीवाल म्हणाले की, आयोध्याबाई




तोष्णीवाल चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून मागील १७ वर्षांपासून सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामध्ये मोफत नेत्र तपासणी शिबिरे, अपंगांसाठी शिबिरे तसेच बसस्थानकावर पाणपोई यांसारख्या उपक्रमांचा समावेश आहे. समाजातील सर्वसामान्य नागरिकांप्रती असलेली बांधिलकी आणि सामाजिक कर्तव्याची जाणीव म्हणून तोष्णीवाल परिवाराच्या वतीने हे उपक्रम सातत्याने राबविले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.अध्यक्षीय भाषणात संदीप भाई शर्मा महाराज यांनी ट्रस्टच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. समाजातील गरजू आणि सर्वसामान्य नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचे कार्य अत्यंत स्तुत्य असल्याचे त्यांनी सांगितले. कमावलेल्या संपत्तीपेक्षा त्या संपत्तीचा विनियोग समाजाच्या हितासाठी केला जात असेल, तर त्या व्यक्तीचे खरे दातृत्व, कर्तृत्व, समर्पण आणि त्याग ईश्वराच्या चरणी अर्पण होत असतो. प्रत्येकाने आपल्या कमावलेल्या संपत्तीचे योग्य नियोजन करून त्यातील काही भाग समाजोपयोगी कार्यासाठी खर्च करावा, असे मत त्यांनी व्यक्त केले.

ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना आर्थिक अडचणींमुळे डोळ्यांच्या उपचारांकडे दुर्लक्ष करावे लागते. अशा नागरिकांसाठी या मोफत शिबिरामुळे मोठी मदत झाली. मोतीबिंदूसारख्या आजाराचे वेळेत निदान होऊन शस्त्रक्रियेसाठी रुग्णांची निवड झाल्याने त्यांच्या दृष्टीच्या समस्येवर उपचाराची संधी उपलब्ध झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यंकटेश राखे यांनी केले तर रणमजी तोष्णीवाल यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कनक पतसंस्थेचे व्यवस्थापक गजानन घुगे, राहुल घुगे, दिनकर मस्के, संजय साबळे, गजेंद्र सेनगावकर, विजय गीते, मेघराज मांडवगडे, रामप्रसाद राखे, विनायक घुगे, ज्ञानदेव कुदळे, मोहन दराडे, सुभाष चोपडे, प्रशांत तायडे आदींनी प्रयत्न केले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# धनगर समाज बांधवांनी 17 सप्टेंबरला मोठी ताकद परभणीत दाखवावी : दिपक बोऱ्हाडे

## हिंगोलीत सकल धनगर समाज बांधवाची बैठक संपन्न

**हिंगोली :-** धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या (एसटी) आरक्षण मिळावे या मागणीसाठी शनिवारी 12 सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह हिंगोली येथे धनगर समाज बांधवांची मल्हारयोद्धा दिपकभाऊ बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक उत्साहात पार पडली.

यावेळी दिपक भाऊ बोराडे यांनी सांगितले की मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनी १७ सप्टेंबर रोजी परभणीत धनगर समाजाचा महामेळावा घेऊन एकदिवसीय आंदोलन छेडण्यात येणार आहे तरी हिंगोली जिल्ह्यातील धनगर बांधवांनी हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे अशा इशारा आज देण्यात आला आहे आरक्षणाचा लढा निर्णयाक करण्यासाठी राजकीय पक्ष आणि नेत्यांवरील अवलंबित्व बाजूला ठेवून धनगर समाजाने - एका झेंड्याखाली एकवटावे असे आवाहन त्यांनी केले हिंगोली जिल्ह्यातील शासकीय विश्रामगृहात आयोजित संवाद बैठकीत दिपक भाऊ बोराडे बोलत होते यावेळी म्हणाले की



धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे विविध राजकीय पक्ष आणि नेत्यांच्या नेतृत्वाखाली धनगर समाज विभागला गेल्याने आरक्षणाच्या प्रश्नावर अपेक्षित एकजूट निर्माण झाली नाही तर आता सर्व पक्षीय मतभेद बाजूला ठेवून धनगर समाजाच्या आरक्षणाची अंमलबजावणी या मागणीसाठी समाज बांधवांनी संघटित होण्याची वेळ आली आहे असे दिपक भाऊ बोराडे यांनी सांगितले मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून होणारा या आंदोलनात धनगर समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन हिंगोली येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या संवाद बैठकीत दिपकभाऊ बोराडे यांनी आवाहन केले आहे

या बैठकीला धनगर समाज नेते गोपाल सातपुते बाळासाहेब नाईक भास्कर पोले नाईक दिनकर कोकरे वामनराव पोले तुकाराम नाईक विजय नाईक संजय चिलगर जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब बारहाते प्रल्हाद जहाने विश्वनाथ गवारे भारत ढाले शंकर ढाले पवन पोले विष्णू पौळ गजानन हाके चंद्रकांत मस्के पांडुरंग इमडे कविताताई इमडे सचिन हराळ पंडित गडदे सदाशिव गडदे संदीप बादड यांच्यासह अनेक समाज बांधव उपस्थित होते.

# सेवा संकल्प अभियान लोकचळवळ करा!; ग्रामपंचायतींनी स्थानिक गरजांनुसार उपक्रम राबवावेत : मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : शासनाच्या योजना आणि विविध सेवा पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येणारे ‘सेवा संकल्प अभियान’ केवळ शासकीय उपक्रम न राहता लोकसहभागातून प्रभावी लोकचळवळ बनवावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी केले.

जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीने स्थानिक गरजा ओळखून आरोग्य, महिला व बाल विकासासह सर्व संबंधित विभागांच्या समन्वयातून विविध उपक्रम राबवावेत. शासनाच्या सेवा आणि योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासोबतच नागरिकांचा शासनाशी थेट संवाद वाढविणे, हा अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

महिला, बालके, युवक, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग तसेच वंचित आणि गरजू घटकांना अभियानाच्या केंद्रस्थानी ठेवण्यात यावे. यासाठी आरोग्य तपासणी शिबिरे, महिला आरोग्य व स्वच्छता जनजागृती, पोषण व ॲनिमिया प्रतिबंध, योग-ध्यान, व्यसनमुक्ती, स्वच्छता, वृक्षारोपण, जलसंधारण आणि आरोग्य जनजागृतीसह विविध उपक्रम घेण्यात यावेत, असे सोळंके यांनी सांगितले.

पात्र लाभार्थ्यांना योजनांचा थेट लाभ

शासकीय योजनांची केवळ माहिती न देता पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी ग्रामपंचायत पातळीवर विशेष प्रयत्न करावेत. ‘सेवा माझे योगदान’ या संकल्पनेला लोकसहभागाची जोड देत प्रत्येक गावाने आपल्या क्षमतेनुसार सेवा आणि सामाजिक योगदानाचे उपक्रम राबवावेत.

दरम्यान, ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ अभियानांतर्गत सुरू असलेले आरोग्य, पोषण, स्वच्छता, महिला व बाल आरोग्य आणि जनजागृतीचे उपक्रम ‘सेवा संकल्प अभियानाशी’ जोडण्यात यावेत. त्यामुळे दोन्ही अभियानांचा व्यापक परिणाम साधता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

‘शासनाची सेवा – जनतेच्या दारी’ हा संकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी अधिकारी-कर्मचारी, ग्रामपंचायत पदाधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, महिला बचत गट, युवक मंडळे आणि नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा. प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत शासनाच्या सेवा पोहोचवून गावांना अधिक सक्षम, निरोगी आणि स्वावलंबी बनविणे, हेच ‘सेवा संकल्प अभियानाचे’ खरे यश ठरेल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी नमूद केले.

# ग्रामीण पोलीस दलातील वरिष्ठ उपअधीक्षक सूर्यकांत कोकणे यांचा पदोन्नतीबद्दल सेवापथ सोशल फाउंडेशन संस्थेतर्फे सत्कार

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

ग्रामीण पोलीस मुख्यालयात नुकताच एका अत्यंत उत्साही आणि प्रेरणादायी वातावरणात एका सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस मुख्यालयात पदोन्नती घेऊन वरिष्ठ उपअधीक्षक या महत्त्वपूर्ण पदावर विराजमान झालेले सूर्यकांत कोकणे यांचा स्वागत आणि सत्कार समारंभ ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालयात पार पडला. या विशेष प्रसंगी सेवापथ संस्थेच्या वतीने सन्मानपत्र आणि शाल भेट देऊन त्यांचा गौरवण्यात आला. तसेच त्यांना त्यांच्या उज्ज्वल आणि यशस्वी भावी



वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

पोलीस दलात सेवा बजावत असताना सूर्यकांत कोकणे यांनी नेहमीच आपल्या कर्तृत्वाने आणि उत्कृष्ट कार्यशैलीने एक वेगळा ठसा उमटवला आहे. त्यांच्या याच निष्ठेची आणि उत्कृष्ट सेवेची पावती म्हणून त्यांना ही पदोन्नती मिळाली असून, यामुळे पोलीस वर्तुळात तसेच नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. त्यांच्या कार्यालयात आयोजित या सत्कार समारंभास विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि सेवापथ संस्थेचे पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते. या सत्कारानंतर बोलताना उपस्थितांनी कोकणे कर्तव्यकठोर आणि जनमानसात विश्वास निर्माण करणाऱ्या कार्यप्रणालीचा विशेष गौरव केला.

# महाडीबीटी 1.0 पोर्टल 15 सप्टेंबरपर्यंत कार्यान्वित

## प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज तातडीने निकाली काढण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी, :** भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती (फ्रीशिप) योजनेंतर्गत जिल्ह्यातील महाविद्यालयांकडे प्रलंबित असलेले शिष्यवृत्ती अर्ज तातडीने निकाली काढण्यासाठी समाज कल्याण विभागामार्फत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. यासाठी महाडीबीटी १.० (जुने महाडीबीटी) पोर्टल दि. १० ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत कार्यान्वित करण्यात आले आहे.

परभणी जिल्ह्यातील सर्व कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, व्यावसायिक व बिगर व्यावसायिक महाविद्यालये तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या महाडीबीटी १.० पोर्टल लॉगिनवर प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची तातडीने कार्यवाही पूर्ण करावी. महाडीबीटी १.० वरील शैक्षणिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६ मधील प्रलंबित अर्जांची संबंधित संस्था व विभाग स्तरावर छाननी करून आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे.

महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर प्रलंबित अर्जांमधील कागदपत्रे, पात्रता, विद्यार्थ्यांची माहिती तसेच आवश्यक त्रुटींची पूर्तता करून पात्र अर्ज पुढील कार्यवाहीसाठी समाज कल्याण कार्यालय, परभणी येथे तातडीने (फॉरवर्ड करावेत) पाठवावेत. तसेच, विद्यार्थी स्तरावर अर्ज प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांशी संबंधित महाविद्यालयांनी तत्काळ संपर्क साधून आवश्यक त्रुटींची पूर्तता करून घ्यावी. महाडीबीटी १.० पोर्टलवर दि. १० ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नवीन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. नवीन अर्ज केवळ महाडीबीटी २.० पोर्टलवर स्वीकारले जातील. त्यामुळे महाडीबीटी १.० पोर्टलचा वापर प्रामुख्याने पूर्वीपासून प्रलंबित असलेल्या अर्जांची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी करावा. कोणताही पात्र अर्ज प्रलंबित राहणार नाही, याची सर्व संबंधित महाविद्यालयांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त राजू एडके यांनी केले आहे.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी विविध विकासकामांचा धडाका; मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन-भूमिपूजन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर १७ सप्टेंबर रोजी विभागीय क्रीडा संकुलात आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची प्रशासकीय तयारी वेगाने सुरू झाली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शहरातील विविध विकासकामांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करण्याचे नियोजन असून, त्यासाठी प्रशासनाने कार्यक्रमस्थळाची पाहणी करून तयारीचा आढावा घेतला.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा आणि छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी संयुक्तपणे क्रीडा संकुल परिसराची पाहणी



केली. कार्यक्रमासाठी आवश्यक असलेल्या सुविधा, सुरक्षा व्यवस्था, बैठक व्यवस्था आणि इतर बाबींचा त्यांनी आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

कार्यक्रमासाठी स्टेडियम परिसरात किमान पाच हजार विद्यार्थी व विद्यार्थिनींची बैठक व्यवस्था करण्याचे नियोजन आहे. विद्यार्थ्यांना कार्यक्रमस्थळी पोहोचताना तसेच कार्यक्रमानंतर परतताना वाहतुकीची किंवा अन्य कोणतीही अडचण होऊ नये, यासाठी स्वतंत्र नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

महापालिकेची दहा विकासकामे केंद्रस्थानी

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या विविध विकासकामांपैकी किमान दहा कामांचे उद्घाटन अथवा भूमिपूजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्याचे प्राथमिक नियोजन आहे. या कामांची माहिती, कार्यक्रमाची रूपरेषा आणि संबंधित विभागांकडून आवश्यक तयारी तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

कार्यक्रमस्थळी स्वच्छता, पिण्याचे पाणी, विद्युत व्यवस्था, वाहतूक नियंत्रण, बैठक व्यवस्था तसेच सुरक्षा यंत्रणेच्या दृष्टीने कोणतीही त्रुटी राहू नये, यावर प्रशासनाने विशेष भर दिला आहे.

सुरक्षा आणि वाहतुकीवर विशेष लक्ष

मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमस्थळी सुरक्षा व्यवस्थेला विशेष महत्त्व राहणार आहे. त्याचबरोबर मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित राहणार असल्याने गर्दीचे नियोजन, प्रवेश-निर्गमन व्यवस्था आणि वाहतूक नियंत्रण याबाबतही काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, शहर अभियंता संजय कोंबडे, अतिरिक्त शहर अभियंता अमोल कुलकर्णी, उपायुक्त अपर्णा थेटे, नंदकिशोर भोंबे यांच्यासह महानगरपालिका आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

१७ सप्टेंबरच्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त होणारा हा कार्यक्रम सुरळीत पार पडावा आणि मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रस्तावित विकासकामांना गती मिळावी, यासाठी प्रशासनाकडून अंतिम तयारीला आता वेग आला आहे.

# ब्रिजवाडी मनपा शाळेत दुर्घटनेनंतर निर्णय; विद्यार्थ्यांसाठी नवीन शाळा बांधणार

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

मनपा प्राथमिक विद्यालय, ब्रिजवाडी येथे शाळेच्या मागील बाजूचे प्लास्टर पडल्यामुळे एका विद्यार्थिनीला दुखापत झाल्याची घटना घडली होती. घटनेनंतर सतर्क शिक्षकांनी तत्काळ विद्यार्थिनीला उपचारासाठी दवाखान्यात नेऊन प्रथमोपचार केले व पालकांना माहिती देऊन तिला त्यांच्या स्वाधीन केले.



या दुर्घटनेची गंभीर दखल घेत महापालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, उपायुक्त अंकुश पांढरे, शहर अभियंता संजय कोंबडे, शिक्षणाधिकारी भारत तीनगोटे आणि प्रशासन अधिकारी संजीव सोनार यांनी आज प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन पाहणी केली. पाहणीदरम्यान शाळेतील काही वर्गखोल्या मोडकळीस आल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत, या मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यांमध्ये विद्यार्थ्यांना न बसविता अन्य सुरक्षित ठिकाणी वर्ग भरवण्याचे स्पष्ट निर्देश अधिकाऱ्यांनी शिक्षकांना दिले. तसेच, ब्रिजवाडी येथे विद्यार्थ्यांसाठी नवीन शाळा बांधण्याच्या प्रस्तावाचा तात्काळ नियोजनात समावेश करून लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील यांनी दिले. यावेळी स्थानिक पालकांनीही नवीन शाळा बांधण्याची आग्रही मागणी केली होती, जी प्रशासनाने मान्य केली आहे.

दरम्यान, विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होऊ नये आणि त्यांची सुरक्षितता पूर्णपणे अबाधित राहावी, यासाठी शाळेतील सुस्थितीत असलेल्या वर्गखोल्यांमध्ये पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. त्यानुसार बालवाडी, इयत्ता पहिली आणि दुसरीचे वर्ग दुपारच्या सत्रात भरवण्यात येणार असून, उर्वरित सर्व वर्ग सकाळच्या सत्रात भरवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# वेदांतनगर क्रीडा संकुलाचे काम गतीने पूर्ण करा; आयुक्त अमोल येडगे

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

वेदांतनगर येथे बीओटी तत्त्वावर उभारण्यात येत असलेल्या क्रीडा संकुलाची महापालिका आयुक्त अमोल येडगे यांनी आज प्रत्यक्ष पाहणी केली. या प्रकल्पांतर्गत पोहण्याचा तलाव आणि मल्टीपर्पज हॉल विकसित करण्याचे काम सुरू आहे. सुमारे ४०,६९१ चौ.मी. क्षेत्रफळावर पसरलेल्या या प्रकल्पात ६ लेनचा तलाव, मल्टीपर्पज हॉल आणि त्यास पूरक इतर सुविधा असणार आहेत. तसेच



महापालिकेच्या हिश्यात २०० चौ.मी. क्षेत्रफळाचा स्वतंत्र हॉल मिळणार आहे.

हा प्रकल्प ३० वर्षांच्या भाडेपत्ता करारावर असून, त्याचे भोगवटा प्रमाणपत्र आधीच प्राप्त झाले आहे. पाहणीदरम्यान आयुक्तांनी प्रकल्पाच्या सद्यस्थितीचा सखोल आढावा घेतला. प्रशासकीय व आर्थिक पूर्तता नियमानुसार पूर्ण करण्यात आली असून, नागरिकांना क्रीडा व मनोरंजनासाठी या सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करून द्याव्यात, असे स्पष्ट निर्देश त्यांनी संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांना दिले. या पाहणी दौऱ्यात उपायुक्त विकास नवाळे यांच्यासह मनपाचे अधिकारी व प्रकल्पाशी संबंधित ठेकेदार उपस्थित होते.

# गोडीजी पार्श्वनाथ मंदिरात 14 स्वप्ने व पाळणा महोत्सव उत्साहात

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : शहरातील अति प्राचीन श्री गोडीजी पार्श्वनाथ जैन मंदिर, जोहरीवाडा आणि श्री मुनिसुव्रतस्वामी मंदिर, कर्णपुरा येथे श्री आनंदजी कल्याणजी जैन श्वेतांबर मंदिर ट्रस्टतर्फे महापर्वाधिराज पर्युषण आराधनेअंतर्गत भगवान महावीर जन्म कल्याणक सोहळा भक्तिभावात पार पडला.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण गुजरातचे प्रसिद्ध जैन संगीतकार ऋषभ जैन (आरएसजे) यांची संगीतमय प्रस्तुती ठरली. ‘त्रिशला दुलारे पालना झुले’, ‘आया पर्युषण हमारा’ आदी भजनांच्या तालावर माता त्रिशलांना पडलेल्या १४ शुभ स्वप्नांचे सजीव सादरीकरण करण्यात आले. फुलांनी



सजविलेला चांदीचा पाळणा भाविकांचे आकर्षण ठरला.

दुपारी १२.३९ वाजता १४ स्वप्ने, पाळणाजी, अष्टमंगल, वार्षिक अष्टप्रकारी पूजा व अखंड दीपक आदींच्या चढाव्यांसाठी बोली घेण्यात आली. भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवित पुण्यार्जन केले. त्यानंतर प.पू. साध्वीजी कोटीगुणाश्रीजी म.सा. आदी ठाणा-६ यांच्या मुखारविंदातून भगवान महावीरांचे जन्मवाचन झाले.

गच्छाधिपती प.पू. अभयदेवसूरीश्वरजी म.सा. यांच्या प्रेरणेने अभय मांगलिक मंडळातर्फे लाभार्थींना १४ स्वप्ने व अष्टमंगलच्या प्रतिकृती भेट देण्यात आल्या. ट्रस्टी कनकमलजी सुराणा, रतीलालजी मुगदिया व जव्हेरचंदजी डोसी यांनी उपस्थित सकल जैन समाजाचे आभार मानले. कार्यक्रमानिमित्त महाप्रसादी स्वामीवात्सल्य व चोविहारची व्यवस्था करण्यात आली.

# रोपळेकर चौकात बॅग हिसकावणारा 12 तासांत जेरबंद; 40 हजार 960 रुपयांचा मुद्देमाल जप्त

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : रोपळेकर चौक परिसरात पानटपरी चालकाच्या हातातील सामानाची बॅग मोटारसायकलवरून आलेल्या हेल्मेटधारी चोरट्याने बळजबरीने हिसकावून नेल्याची घटना घडली होती. या प्रकरणाचा जवाहरनगर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे अवघ्या १२ तासांत छडा लावत आरोपीला ताब्यात घेतले. आरोपीकडून चोरीस गेलेला मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे.

जितेंद्र रणछोडदास वैष्णव (५८, रा. निरंजन हौसिंग सोसायटी, टिळकनगर, उल्कानगरी) हे पानटपरी चालक आहेत. १० सप्टेंबर रोजी सकाळी साडेसहाच्या सुमारास ते रोपळेकर चौकाजवळील सागर पानटपरीची साफसफाई करून व्यवसाय सुरू करत होते. त्यावेळी त्यांच्या हातात काळ्या रंगाची सामानाची बॅग होती. अचानक काल्डा कॉर्नरच्या दिशेने लाल-काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून हेल्मेट घातलेला एक व्यक्ती आला. मोटारसायकल उभी करून त्याने वैष्णव यांच्या हातातील बॅग बळजबरीने हिसकावली आणि मोटारसायकलवरून पसार झाला.

बॅगेत ३२ हजार ५६० रुपये किमतीचे गोल्ड फ्लेक, फोर स्क्वेअर, मार्लबोरो कंपनीच्या सिगारेटची पाकिटे, बिडीचे बंडल व माचिसची पाकिटे, तसेच ७ हजार ८०० रुपये रोख आणि ६०० रुपये किमतीचे पेटीएम व



भारतपेचे स्पीकर व स्कॅनर असा एकूण ४० हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल होता.

याप्रकरणी जवाहरनगर पोलिस ठाण्यात गु.र.क्र. ४०२/२०२६, भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०४ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपास अधिकारी पोहेकॉ. १४३२ तडवी यांनी तपास सुरू केला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अंमलदार मारोती गोरे व राजेंद्र शिंदे यांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासले. तसेच गुप्त बातमीदारांकडून माहिती घेत तांत्रिक तपासाची मदत घेण्यात आली.

तपासादरम्यान संशयित आरोपी सातारा परिसरातील नाईकनगर येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी मनिष दिलीप गोरवाडकर (४३, व्यवसाय—सुरक्षा रक्षक, रा. देवगिरी कॉलनी, सातारा-बीड बायपास) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने टीव्हीएस मोटारसायकलवर हेल्मेट घालून बॅग हिसकावून चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

११ सप्टेंबर रोजी आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला एका दिवसाची पोलिस कोठडी सुनावली. या कोठडीदरम्यान चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यामुळे आरोपीसह मुद्देमाल जप्त करून गुन्ह्याचा उलगडा करण्यात जवाहरनगर पोलिसांना यश आले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911